<u>रे.क.नं. ११/२०१५ नि. ४७ खालील आदेश.</u>

**(CNR NO. MHKO110000562015)**

त्रयस्थ अर्जदार हिने सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता कलम आदेश १ नियम १०(२) ज्यादा पक्षकार करणेसाठी दाखल केलेला आहे.

२. वादी यांनी याच अर्जावर योग्य ते आदेश पारीत करणेबाबत म्हणणे दाखल केले आहे.

३. वादी,प्रतिवादी यांचेतर्फे विद्वान वकिलांचा युक्तीवाद ऐकला. सदर अर्जाचे कामी मी खालीलप्रमाणे मुद्दे काढीत असून त्याप्रमाणे कारणासह निष्कर्ष नोंदवित आहे.

| | <u>मुद्दे</u> | <u>निष्कर्ष</u> |
|---|---|---|
| १. | त्रयस्थ अर्जदार ही वादग्रस्त असलेला खराखुरा प्रश्न निर्णीत करणेसाठी आवश्यक आहे का ? | होय. |
| २. | काय आदेश ? | अर्ज मंजूर करणेत येत आहे. |

<u>कारणमिमांसा-</u>

<u>मुद्दा क्रमांक १ करिता</u>-

४. त्रयस्थ अर्जदार हिने अर्जामध्ये असे कथन केले आहे की, दावेतील प्रतिवादी श्री.पांडुरंग बाळू चौगले हे मयत झाल्यानंतर वादी यांनी तिला सदर कामी पांडुरंग चौगुले यांचे वारस म्हणून दावेत समाविष्ठ केलेले नाही. त्रयस्थ अर्जदार ही पांडुरंग चौगुले यांचे सर्वात थोरले मुलगे सदाशिव पांडुरंग चौगुले यांची पहिली कायदेशिर धर्मपत्नी आहे. परंतू पतीचे मृत्युपश्चात ती तिचे वडीलांचे घरी नागांव येथे राहत आहे. प्रस्तुत दावे कामी ती आवश्यक पक्षकार असूनही आणी त्रयस्थ अर्जदार यांचा दावेतील दावा मिळकतीमध्ये मालकी कब्जेवहिवाटी हितसंबंध असूनही त्रयस्थ अर्जदार यांना पक्षकार केले नाही. म्हणून त्रयस्थ अर्जदार यांना पक्षकार करुन घेणेबाबत दाखल केलेला आहे.

५.   एकंदरीत अर्जाचे व म्हणण्याचे अवलोकन करता असे दिसून येते की, वादी यांनी निशाणी ३ सोबत दाखल केलेल्या अ.नं. १ वरील गट नंबर १०८३ चा ७ x १२ सदरी भोगवटादार म्हणून पांडुरंग बाळु चौगले यांची नोंद असल्याचे दिसून येते असल्याचे दिसून येते. वादीचा दावा हा  हक्कज्ञापनाचा आहे. तसेच सदरच्या मिळकत ही वाडवडीलार्जीत मालकीच्या असल्याचे दिसून येते. वादीचा दावा हा प्रतिवादी यांनी दावा मिळकतीमधील अतिक्रमण काढून घ्यावे  यासाठी दाखल केलेला आहे. त्यामुळे सदर मिळकतीच्या सहहिस्सेदारांच्या वारसांना या कामात आवश्यक पक्षकार करणे अंतिम न्यायदानाच्या दृष्टीने योग्य होणार आहे.  अद्याप दावेची  चौकशी सुरु झालेली नाही. अशाप्रकारे आवश्यक पक्षकारांना दाव्यात सामील न केलेस दाव्याचा गुणदोषावर निर्णय करणे अशक्य होणार आहे. त्यामुळे त्रयस्थ अर्जदार यांनी त्यांना याकामी प्रतिवादी नं.१ पांडुरंग बाळू चौगुले यांचे वारस म्हणून आवश्यक पक्षकार म्हणून  समाविष्ठ करणेची मागणी  योग्य असल्याचे मत मी नोंदवित आहे.  अशाप्रकारे दुरुस्ती मंजूर झाल्यास दाव्याचा गुणदोषावर अंतिम न्यायनिर्णय होणेस मदत होणार आहे. याउलट अशाप्रकारे दुरुस्ती न केलेस दाव्यामध्ये गुंतागुंत निर्माण होण्याची शक्यता आहे. अशाप्रकारचे ज्यादा दावे निर्माण होण्याची शक्यता आहे. अशाप्रकारचा गुंता  न्यायाच्या दुष्टीने टाळणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे अर्जदाराने मागितलेली ज्यादा पक्षकार नमुद करणेची मागणी दाव्याचे गुणदोषावरील भवितव्यासाठी योग्य असलेचे मत मी नोंदवित आहे. त्यामुळे अर्जदारांचा प्रस्तुतचा अर्ज  मंजूर करणे आवश्यक असल्याचे मत मी नोंदवित आहे. त्याप्रमाणे मी मुद्दा क्रमांक १ चे उत्तर होकारार्थी नोंदवून मुद्दा क्रमांक २ चे उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

<u>आ दे श</u>

०१.   त्रयस्थ अर्जदारचा नि.४७ वरील अर्ज  मंजूर करणेत येत आहे.

०२.   वादीने नि.४७ प्रमाणे दुरुस्ती करुन त्रयस्थ अर्जदार म्हणून प्रतिवादी नं. १ यांचे वारस म्हणून त्रयस्थ अर्जदार हिचे नावाची नोंद करुन दाव्याची दुरुस्ती प्रत चौदा दिवसांचे आत दाखल  करावी.

सही/-
(सं.मा.जाधव)
दुसरे  दिवाणी न्यायाधीश क.स्तर
<u>पेठ वडगांव.</u>

दिनांक  २९.११.२०१७.

**CERTIFICATE.**

I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/Order are same,word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Mrs. Rajashri Rajendra Sawant (L.G.) |
| Name of Court | Shri. S.M.Jadhav, 2nd Jt. C.J.J.D. and J.M.F.C., Peth Vadgaon |
| Date of Dictation | 29.11.2018 |
| Judgment signed by the P.O. on | 29.11.2018 |
| Judgment/Order uploaded on | 30.11.2018 |